पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – २१७**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ०७/०४/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **०७/०४/२०२१** रोजी **दुपारी २.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा. सदस्य सभागृहात तसेच काही सन्मा.सदस्य ऑनलाईन द्वारे तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

**१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.फुगे भिमाबाई पोपट
७. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
८. मा.सुलक्षणा राजू धर
९. मा.भोईर सुरेश शिवाजी
१०. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
११. मा.यादव मीनल विशाल
१२. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१३. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील – आयुक्त, मा.विकास ढाकणे –अति.आयुक्त (१), मा.अजित पवार - अति.आयुक्त(१), मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.राय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.चितळे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.लडकत, मा.खाबडे – प्र.सह शहर अभियंता, मा.देशमुख, मा.बहुरे – सहाय्यक आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता वायसीएमएच, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा,गलबले, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा,पाटील, मा.देशमुख, मा,सेठिया, मा.वाघुंडे, मा.काळे, मा.टकले, मा.नरोना – कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशु वैद्यकिय अधिकारी, मा.जगताप

– कामगार कल्याण अधिकारी, मा.हराळे, मा.देशमुख, मा.पानसरे – प्रशासन अधिकारी तथा प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, मा.जरांडे – मुख्य सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.गोफणे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.४१) पिंपरी चिंचवड शहराच्या हद्दीतील नद्यांमध्ये असलेली जलपर्णी काढणेचे कामकाजाबाबत.

विषय क्र.४२) निविदा नोटीस क्र.२९/१/२०२०-२०२१ या कामातून कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम जंबो कोविड हॉस्पीटल येथे तात्पुरत्या स्वरूपात वाढीव क्षमतेचे वातानुकुलन यंत्रणा बसविणे व विद्युत विषयक अनुषंगिक कामे करणे.

विषय क्र.४३) वैद्यकिय विभागाकरीता कोविड-१९ चे कामकाजासाठी शासन नोंदणीकृत संस्थे मार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून घेणेबाबत.

विषय क्र.४४) वायसीएम रूग्णालयातील क्ष किरण विभागातील डीआर सिस्टीम करीता आवश्यक एक्स रे फिल्म खरेदी करणेबाबत.

विषय क्र.४५) क क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कोविड-१९ आपत्कालीन उपाययोजना Isolation Bed Management (IBM) करीता मनपा इमारतीमधे करणेत येत असलेल्या CCCसाठी CCTV यंत्रणा डिझेल जनित्रसंच तसेच इ.अनुषंगिक कामे करणेबाबत.

विषय क्र.४६) रूबी एलकेअर सर्व्हिसेस यांना चालविणेस देण्यात आलेल्या कोविड केअर सेंटरला मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.४७) Covid 19 Rapid Antigen Test Kits खरेदीबाबत.

विषय क्र.४८) Covid 19 चे अनुषंगाने वॉर रूम कामकाज व Contact Tracing करीता नेमणूकांबाबत.

विषय क्र.४९) कोविड १९ अनुषंगाने सर्व झोननिहाय कामकाज करणेकामी वाढीव वैद्यकिय अधिकारी या संवर्गातील उमेदवारांची Walk in Interview द्वारे निवड करून जाहिरातीमध्ये नमूद प्रमाणे मानधन अदा करणेबाबत.

विषय क्र.५०) प्रभाग क्र.३२ मधील एम.एस.काटे चौका लगत नाला बंदिस्त करणे या कामाचे जागेत बदल करणेबाबत.

विषय क्र.५१) दापोडी येथे सर्व सोईसुविधांसह अद्ययावत दवाखाना उभारणेबाबत. – मा.राजू बनसोडे, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५२) विद्युत दाहिनी सुरू करणेबाबत. - मा.राजू बनसोडे, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५३) महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती प्रबोधन पर्वाच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. – मा.शत्रुघ्न काटे, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव.

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२१६ दि.३१/०३/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली**

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२१७ मधील सभाकामकाजात दाखल करणेत आलेला विषय क्र.४१ प्राधान्य क्रमाने घेणेत यावा.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

सभापती - मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२१७ मधील सभा कामकाजात दाखल विषय क्र.४१ प्राधान्य क्रमाने घेणेस मान्यता देणेत येत आहे.

-----------

ठराव क्रमांक – ९१५१ विषय क्रमांक – ४१

दिनांक – ०७/०४/२०२१ विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/९/कावि/८४/२०२१, दि.०७/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड शहरातील नद्यांमधील जलपर्णी काढण्याचे कामकाज निविदा नोटीस क्र.६/२०१९-२० अन्वये मे.साई फ्रेट प्रा.लि. या संस्थेस सोपविण्यात आलेले आहे. दि.११/०३/२०२० रोजीच्या कामाचे आदेशानुसार उपरोक्त संस्थेस दि.१/०३/२०२० ते दि.३०/०६/२०२० (४ महिने) व दि.१/११/२०२० ते २८/०२/२०२१ (४ महिने) यानुसार कामाची मुदत देण्यात आलेली होती. तदनंतर पुन:श्च दि.२६/११/२०२० रोजीच्या आदेशान्वये दि.१/१२/२०२० ते दि.३१/०५/२०२१ (आठवड्यातील ५ दिवस याप्रमाणे एकूण ४ महिने) या कालावधीकरिता नविन कामकाज आदेश निर्गत करण्यात आलेला होता. त्यानुसार सदर संस्थेमार्फत शहरातून प्रवाहीत होणा-या पवना, इंद्रायणी व मुळा नद्यांमधील जलपर्णी काढणेकामी यंत्रे व मनुष्यबळ पुरविण्याचे कामकाज उक्त संस्थेमार्फत करण्यात येत आहे. तथापि, सद्यस्थितीत शहरातील तीनही नद्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात जलपर्णीचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे सदर निविदेद्वारे सोपविण्यात आलेल्या कामकाजानुसार उपलब्ध यंत्रे व मनुष्यबळ जलपर्णी काढण्याकरिता अपुरे पडत असल्याचे निदर्शनास येत आहे. नदीपात्रातील वाढलेल्या जलपर्णीमुळे अनेक सन्माननीय सदस्य तसेच शहरातील सामाजिक संघटना यांनी तातडीने जलपर्णी काढण्यासाठी कारवाई करण्यासाठी मा.आयुक्त सो. यांचेकडे निवेदन दिलेले आहे. त्याअनुषंगाने दि.५/०४/२०२१ रोजी मा.आयुक्त यांचेसमवेत झालेल्या चर्चेमध्ये शहरातील नद्यांमधील जलपर्णी काढण्याकरिता नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदरचे कामकाज हे “टर्न-की” तत्वावर सोपविण्याचे असून शहरातील नद्यांचे ५ पॅकेजमध्ये विभागणी करुन जलपर्णी काढण्याचे कामकाज करण्यात येणार आहे. त्यामध्ये संपूर्ण इंद्रायणी नदीकरिता १ पॅकेज व पवना, मुळा नदीकरिता ४ पॅकेज अशा

प्रकारे निविदा कामकाज सोपविण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. प्रत्येक पॅकेजमध्ये १०० कर्मचारी नियुक्त करावयाचे आहे. तसेच प्रत्येक पॅकेजकरिता किमान १ जेसीबी व २ पोकलेन मशिनची उपलब्धता ठेवणे आवश्यक आहे. सदर कामकाज हे "टर्न-की"तत्वावर करण्यात येणार असल्याने संस्थेमार्फत नियुक्त करण्यात येणा-या कर्मचा-यांना किमान वेतन दर लागू राहणार नाही. तथापि, १०० पेक्षा कमी कर्मचारी नियुक्त केल्यास संबंधित संस्था दंडास पात्र राहील. तसेच सदर जलपर्णी काढण्याचे कामकाज हे कामाचा आदेश निर्गत केल्यापासून ४५ दिवसांचे आत पूर्ण करणे आवश्यक राहील. याकामी इच्छुक संस्थांकडून Expression of Interest प्रसिध्द करुन दर मागविण्यात आलेले आहेत. सदर EOI चा कालावधी ३ दिवसांचा ठेवण्यात आलेला असून प्रस्तुत ५ पॅकेजव्यतिरिक्त टाटा ब्रिज ते बोपखेल या भागात मे.साई फ्रेट प्रा.लि. जे सध्याचे निविदाधारक आहेत त्यांचेमार्फत कामकाज चालू ठेवण्यात येईल. सदर कामकाजाकरिता प्रतिपॅकेज अंदाजे र.रु.४१,८५,५००/- इतका खर्च अपेक्षित असून एकूण खर्च र.रु.२,०९,२७,५००/- (अक्षरी र.रू.दोन कोटी नऊ लाख सत्तावीस हजार पाचशे फक्त) होण्याचा अंदाज आहे. सबब, पिंपरी चिंचवड शहरातील नदीपात्रामध्ये असलेली जलपर्णी काढणेकामी Expression of Interest प्रसिध्द करुन दर मागविण्यास व त्याकामी होणा-या अंदाजे र.रु.२,०९,२७,५००/- चे अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, सदरच्या निविदेच्या EOI मध्ये प्रत्येक पॅकेज करीता १०० ऐवजी २०० कर्मचारी तसेच १ जेसीबी ऐवजी २ जेसीबी व २ पॉकलॅन ऐवजी ४ पॉकलॅन हा बदल करून त्यानुसार येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली.**

सूचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

जलपर्णी काढणेचे काम मार्गी लागे पर्यंत सदरची सभा दि.१५/०४/२०२१ रोजी दु.२.१५ वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

सभापती - सदरची सभा दि.१५/०४/२०२१ रोजी दु.२.१५ वा. पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे)**
सभापती, स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २१७**

(सभावृत्तांत)

(दि.०७/०४/२०२१ ची तहकूब सभा)

**दिनांक – १५/०४/२०२१** **वेळ – दु.२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **दि.०७/०४/२०२१ ची तहकूब** सभा गुरूवार दिनांक **१५/०४/२०२१** रोजी **दुपारी २.१५ वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा. सदस्य सभागृहात तसेच काही सन्मा.सदस्य ऑनलाईन द्वारे तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

**१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.बुर्डे सुवर्णा विकास
७. मा.फुगे भिमाबाई पोपट
८. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
९. मा.सुलक्षणा राजू धर
१०. मा.भोईर सुरेश शिवाजी
११. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१२. मा.यादव मीनल विशाल
१३. मा.भालेकर प्रविण महादेव
१४. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१५. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील – आयुक्त, मा.विकास ढाकणे – अति.आयुक्त (१), मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.राय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.लडकत, मा.खाबडे – प्र.सह शहर अभियंता, मा.खांडेकर, मा.शिंदे,– सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पाटील – प्राचार्य औ.प्र.कैंद्र, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,

मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता वायसीएमएच, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.मोरे, मा.देशमुख, मा,सेठिया, मा.काळे, मा.टकले – कार्यकारी अभियंता, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.गावडे, मा.हराळे, मा.देशमुख – प्रशासन अधिकारी तथा प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे – सहा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.माने - लेखाधिकारी (PMPML) हे अधिकारी उपस्थित होते.

-----------

ठराव क्रमांक – ९१५२ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – ह क्षेत्रिय
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षे/भूजि/५/कावि/६३/२०२१, दि.०२/०३/२०२१

विषय - पिंपरी येथील स.न.२१०, सि.स.नं.४८०१, क्रोमा बिल्डींग शेजारील मनपा वाहनतळ जागा ११ महिन्याकरीता भाड्याने देणेबाबत.

विषय क्र.१ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१५३ विषय क्रमांक – ०२
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – उद्यान स्थापत्य
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/उद्यान/१८६/२०२१, दि.१६/०३/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.42/12/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१८ मधील पार्वती उद्यान, सिल्व्हर ओक, मोरया उद्यान व इतर उद्यानामध्ये स्थापत्य विषयक कामे करणेकामी ओंकार दिपक धवन नि.र.रू.44,99,387/- (अक्षरी र.रु. चव्वेचाळीस लाख नव्याण्णव हजार तीनशे सत्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,63,737/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,63,737/- पेक्षा 13.50% कमी म्हणजेच र.रु.38,61,133/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.42,070/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.35,650/- = एकुण र.रु.39,38,853/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१५४ विषय क्रमांक – ०३

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य BRTS

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/२९७/२०२१, दि.१६/०३/२०२१

विषय - शिंदे वस्ती रावेत येथील रस्त्याचे बीसी पध्दतीने डांबरीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत.

विषय क्र.३ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१५५ विषय क्रमांक – ०४

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/४७७/२०२१, दि.१६/०३/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.43/51/2020-21 अन्वये प्रभाग क्र.२ चिखली बालघरेवस्ती व पवार वस्ती परिसरात ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.अविष्कार एंटरप्रायजेस नि.र.रू.41,23,657/- (अक्षरी र.रु. एक्केचाळीस लाख तेवीस हजार सहाशे सत्तावन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.40,51,357/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.40,51,357/- पेक्षा 27.01% कमी म्हणजेच र.रु.29,57,085/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.17,243/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.30,46,628/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१५६ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १५/०४/२०२१

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ – मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव –

विषय - मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.३७ दि.०४/०३/२०२१

विषय क्र.५ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१५७ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १५/०४/२०२१

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव –

विषय - मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.३८ दि.०४/०३/२०२१

विषय क्र.६ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१५८ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/३०६/२०२१, दि.१९/०३/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.38/13/2020-21 अन्वये प्रभाग क्र.५ मधील परिसरात इत्यादी ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणे व पेव्हिंग ब्लॉकची सुधारणा करणेकामी मे.युनायटेड कन्स्ट्रक्शन नि.र.रू.29,99,921/- (अक्षरी र.रु. एकोणतीस लाख नव्व्याण्णव हजार नऊशे एकवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,67,971/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,67,971/- पेक्षा 30.60% कमी म्हणजेच र.रु.20,59,772/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.32,707/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.31,950/- = एकुण र.रु.21,24,429/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१५९ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/३०७/२०२१, दि.१९/०३/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.24/13/2020-21 अन्वये प्रभाग क्र.५ मधील इत्यादी ठिकाणचे पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दुरूस्ती करणेकामी मे.काव्या असोसिएटस नि.र.रू.44,99,970/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख नव्व्याण्णव हजार नऊशे सत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,50,670/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,50,670/- पेक्षा 43.57% कमी म्हणजेच

र.रु.25,11,513/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.47,966/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.49,300/- = एकुण र.रु.26,08,779/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१६०	विषय क्रमांक – ०९

दिनांक – १५/०४/२०२१	विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम	अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/३१६/२०२१, दि.२३/०३/२०२१

विषय - प्रभाग क्र.४ मधील दिघी येथे डांबरी रस्ते किरकोळ देखभाल दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्र.९ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१६१	विषय क्रमांक – १०

दिनांक – १५/०४/२०२१	विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे	अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/३१४/२०२१, दि.२३/०३/२०२१

विषय - प्रभाग क्र.७ मध्ये अंतर्गत कॉलनी रस्ते व मुख्य डांबरी रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणेबाबत.

विषय क्र.१० चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१६२	विषय क्रमांक – ११

दिनांक – १५/०४/२०२१	विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे	अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/३१५/२०२१, दि.२३/०३/२०२१

विषय - प्रभाग क्र.७ मधील विविध रस्त्यांची हॉटमिक्स पध्दतीने दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्र.११ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१६३ विषय क्रमांक – १२
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/३१७/२०२१, दि.२३/०३/२०२१

विषय - प्रभाग क्र.४ दिघी मधील विविध ठिकाणी हॉटमिक्स पध्दतीने डांबरी रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्र.१२ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१६४ विषय क्रमांक – १३
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – उद्यान
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/१६८/२०२१, दि.२३/०३/२०२१

विषय - मनपाचे विविध कार्यक्रमासाठी हार, फुले, गुच्छ, नारळ इ.साहित्य पुरविणे कामाबाबत.

विषय क्र.१३ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१६५ विषय क्रमांक – १४
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ–मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/४७५/२०२१, दि.३१/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.18/2020-2021 अन्वये फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत कोविड केअर सेंटर (CCC) आणि आयसोलेशन वॉर्ड साठी तात्पुरत्या स्वरुपात जनित्र संच ऑपरेटरसह भाडेतत्वावर वापरणेबाबत (2020-2021) मे.कमल इलेक्ट्रीक एन्टरप्रायजेस निविदा र.रु.35,64,000/- (अक्षरी र.रु.पस्तीस लाख चौसष्ट हजार फक्त) पेक्षा - 14.30% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१६६ विषय क्रमांक – १५
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/४३०/२०२१, दि.२०/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.19/1/2020-21 अन्वये मोरेवस्ती चिखली परिसरातील जलनिःसारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकामी मे.एस.के.भोसले कॉन्ट्रॅक्टर नि.र.रू.44,78,520/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख अठ्याहत्तर हजार पाचशे वीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,78,520/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,78,520/- पेक्षा 33% कमी म्हणजेच र.रु.30,00,608/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.8,650/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.30,09,258/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१६७ | विषय क्रमांक – १६

दिनांक – १५/०४/२०२१ | विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/३/कावि/२४६/२०२१, दि.३०/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोना विषाणूचे संसर्गामुळे कोवीड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या साथीमुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील दि.१४ मार्च २०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार कोरोना विषाणूच्या उद्भवलेल्या संसर्ग रोगाचा प्रतिबंध नियंत्रणाकरीता मा.आयुक्त महापालिका अशा क्षेत्रामध्ये सर्व शासकिय विभाग व संस्थांच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांची सेवा निर्देशित करतील अशी तरतुद आहे. मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेकडील अधिकारी/कर्मचारी यांनी दि.०८-११-२०२० अखेर यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरीता कामकाज केलेले असल्याने त्यांना मेहनताना अदा करणेबाबत अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांनी अभिप्राय सादर केलेले आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेमध्ये दि.०९-०६-२०२० व दि.१५-१०-२०२० रोजी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच वैद्यकिय विभागाकडील आदेश क्र.वैद्य/३/कावि/३९०/२०२०, दि.०३-०७-२०२० व आदेश क्र.वैद्य/३/कावि/६४७/२०२०, दि.२७-१०-२०२० नुसार दि.०१-११-२०२० ते दि.०८-११-२०२० या वाढीव कालावधीचा करारनामा करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामधील मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा. लि. यांचे कॅथलॅबच्या आय.सी.यू. मधील २७ बेड करीता यापूर्वीचे प्रचलित दर प्रति बेड/दिन र.रु.५,८४७/- नुसार त्यांचेकडील उपलब्ध ३० प्रोफेशनल्स व २२८ वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी यांचे दि.०१-११-२०२० ते दि.०८-११-२०२० या अधिग्रहण कालावधीतील वेतनाकरीता र.रु.१२,६२,९५२/- इतक्या अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ९१६८ विषय क्रमांक – १७

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/३/कावि/२४८/२०२१, दि.३०/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोना विषाणूचे संसर्गामुळे कोवीड १९ या संसर्गजन्य आजाराच्या साथीमुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील दि.१४ मार्च २०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार कोरोना विषाणूच्या उद्भवलेल्या संसर्ग रोगाचा प्रतिबंध नियंत्रणाकरीता मा.आयुक्त महापालिका अशा क्षेत्रामध्ये सर्व शासकिय विभाग व संस्थांच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांची सेवा निर्देशित करतील अशी तरतुद आहे. महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे Dedicated Covid Hospital (DCH) म्हणुन निश्चित करण्यात आलेले होते. मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.७११८, दि.२७-०५-२०२० व ठराव क्र.७५३१, दि.०७-१०-२०२० अन्वये मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेकडील अधिकारी व कर्मचारी वर्गाची सेवा दि.०१-०४-२०२० ते दि.३१-१०-२०२० अखेर अधिग्रहित करुन याकामी होणा-या खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेमध्ये दि.०९-०६-२०२० व दि.१५-१०-२०२० रोजी करारनामा करण्यात आलेला असून वैद्यकिय विभागाकडील आदेश क्र.वैद्य/३/कावि/३९०/२०२०, दि.०३-०७-२०२० व आदेश क्र.वैद्य/३/कावि/६४७/२०२०, दि.२७-१०-२०२० अन्वये आदेश निर्गत करण्यात आलेला आहे.त्याची मुदत दि.३१-१०-२०२० रोजी संपलेली आहे. वायसीएम रुग्णालयातील मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा. लि. यांचेकडील अधिकारी/ कर्मचारी हे कोविड-१९ चे आपतकालीन कामकाजासाठी उपलब्ध करुन देणेबाबत पत्र क्र.वायसीएमएच/१५/कावि/२८५/२०२१ दि.२७-०३-२०२१ अन्वये कळविले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेमध्ये दि.०९-०६-२०२० व दि.१५-१०-२०२० रोजी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच वैद्यकिय विभागाकडील कोविड-१९ चे आपतकालीन कामकाजासाठी उपलब्ध करुन देणेबाबत त्यानुसार यापूर्वीचे प्रचलित दर प्रति बेड/दिन र.रु.५,८४७/- नुसार त्यांचेकडील उपलब्ध ३० प्रोफेशनल्स व २२८ वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी यांचे दिनांक २९-०३-२०२१ ते दि.२७-०५-२०२१ या अधिग्रहण कालावधीतील वेतनाकरीता र.रु.९४,७२,१४०/- इतक्या अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१६९ विषय क्रमांक – १८

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्य.सा.भां., वैद्यकिय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३४०/२०२१, दि.२६/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारत सरकार तसेच राज्य शासानाने कोरोना विषाणू Covid-19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात

साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ लागू करुन राष्ट्रीय आपत्ती घोषित करुन कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेकरीता युध्दपातळीवर कामकाज करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) (क) नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी तातडीचे कामकाजास्तव M/s.Medbros Healthcare Pvt. Ltd., यांना कोरोना बाधित रुग्ण मरण पावल्यास त्यावर Expression of Interest मध्ये निर्देशित केलेप्रमाणे योग्य तो प्रोटोकॉल पाळुन मृतदेहासंबंधी कामकाज करण्यासाठी ८ कर्मचारी ऑटो क्लस्टर येथे दिनांक २७/०४/२०२१ पर्यंत उपलब्ध करुन देणेकामी येणा-या र.रु.२८,०२१/-X ८ = र.रु.२,२४,१६८/- प्रमाणे दिनांक १३/०२/२०२१ पासून दिनांक २७/०४/२०२१ या कालावधीकरीता येणा-या र.रु.४,४८,३३६/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१७० विषय क्रमांक – १९

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्य.सा.भां., वैद्यकिय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३४१/२०२१, दि.२६/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांची शिफारस विचारात घेऊन –

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) नुसार Covid-19 या विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता, अत्यावश्यक बाब म्हणून कोविड-१९ जैव वैद्यकीय कचरा गोळा करणे आणि त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याच्या खर्चाबाबत मे.पास्को इनव्हायरमेंटल सोल्यूशनस प्रा.लि., यांनी दिलेल्या प्रस्तावास अधिन राहून माहे नोव्हेंबर २०२० मध्ये ५३ ठिकाणांहुन कोविड-१९ जैव वैद्यकीय कचरा वाहतुक केलेला आहे. (या ठिकाणां व्यतिरिक्त कचरा वाहतुकीचे ठिकाणांमध्ये वाढ होवू शकते) त्याप्रमाणे प्रति ठिकाण प्रति महा र.रु.१५,०००/- हे फिक्स चार्जेस वाहतुकीसाठी र.रु.७,९५,०००/- अधिक कोव्हीड-१९ कचरा निर्मूलन साठी र.रु.१००/- प्रति किलो प्रमाणे माहे नोव्हेंबर २०२० या कालावधीमध्ये जमा केलेला कोविड-१९ जैव वैद्यकीय कचरा एकूण २१,०६४.४४५ Kg करीता एकूण र.रु.२१,०६,४४४.५० पूर्णांकित करुन र.रु.२१,०६,४४५/- असा एकूण र.रु.२९,०१,४४५/- तसेच माहे डिसेंबर २०२० पासून प्रति ठिकाण प्रति महा र.रु.१५०००/- हे फिक्स चार्जेस वाहतुकीसाठी व कोव्हीड-१९ कचरा निर्मूलन साठी र.रु.१००/- प्रति किलो प्रमाणे किंवा प्रशासकीय मान्यता प्राप्त दरानुसार येणा-या प्रत्यक्ष खर्चास महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) नुसार कार्योत्तर मान्यता देणेची मा.अति.आयुक्त(१) यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामाकरीता र.रू.२९,०२,४४५/- (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख दोन हजार चारशे पंचेचाळीस फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१७१ विषय क्रमांक – २०

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – प्रशासन

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१५/कावि/६८/२०२१, दि.३०/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वर्ग १ ते वर्ग ४ चे अधिकारी/कर्मचारी यांना सन १९७९-८० पासून शासन निर्णयाच्या आधारे महानगरपालिका ठराव व स्विकृत धोरणानुसार घरबांधणी, भुखंड, घरदुरुस्ती, घरविस्तार अग्रिम दिले जात आहे. सद्यस्थितीत शासन निर्णय क्रमांक घबांअ-2012/प्र.क्र.30/२०१२/विनियम मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.२० फेब्रुवारी २०१५ अन्वये तसेच मनपा धोरणानुसार घरबांधणी अग्रिमासंदर्भात खालील प्रमाणे धोरण निश्चित केले आहे व त्यानुसार घरबांधणी व इतर अग्रिम मंजूर केले जाते.

| अ.क्र. | अग्रिमाचा तपशिल | घरबांधणी अग्रिमाच्या रक्कमेची कमाल मर्यादा |
|---|---|---|
| | | "एक्स" वर्गीकरण |
| अ) | १) जमीन खरेदी करुन त्यावर विहित कालावधीत घर बांधणे किंवा २) स्वत:च्या मालकीच्या जागेवर नवीन घर बांधणे, किंवा ३) स्वत:च्या मालकीच्या जागेवरील मोडकळीस आलेले घर पाडून नवीन घर बांधणे,किंवा ४) बांधकाम चालू असलेले नवीन घर किंवा तयार नवीन घर खरेदी करणे.(घरबांधणी अग्रिम) | मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ब) | घर बांधण्यासाठी जमीन खरेदी करणे. ( भुखंड खरेदी अग्रिम ) | मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.१५.०० लक्ष किंवा जमिनीची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| क) | स्वत:च्या मालकीच्या राहत्या घराचे नवीन बांधकाम करुन विस्तार करणे. (घर विस्तार अग्रिम ) | मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.१५.०० लक्ष किंवा बांधकामाची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ड) | सध्याचे राहते घर निवास योग्य करण्यासाठी घरदुरुस्ती अग्रिम (राहत्या घरात नवीन सोयी किंवा अंतर्गत सजावट करणे यासाठी अनुज्ञेय नाही ) | मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) १०० पट किंवा रु.७.५० लक्ष किंवा घरदुरुस्तीचा खर्च किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| इ) | हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन (H.D.F.C.) , राष्ट्रीयकृत बँका/सहकारी बँका,महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशन व तत्सम शासन मान्य वित्तीय संस्थाकडून घरबांधणीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी | कर्मचा-याने वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम वजा अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेपर्यंत कर्मचा-याने संस्थेला परतफेड केलेली रक्कम किंवा अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला वित्तीय संस्थेला परतफेड करण्यासाठी बाकी राहिलेली रक्कम किंवा मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन)२०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| फ | जुने घर विकत घेण्यासाठी अग्रिम | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी ( Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत किंवा मूळ वेतनाच्या २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनियम मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक.०२ फेब्रुवारी २०२१ अन्वये ७ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीतील मुळ वेतनानुसार घरबांधणी अग्रिम मंजुरीच्या मर्यादेत सुधारणा करणेत आलेल्या आहेत व त्यास अनुसरुन पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघ यांनी दि.08/02/2021 च्या पत्रान्वये वरील शासन निर्णयान्वये मनपा कर्मचा-यांना देखीन घरकर्जात वाढ करण्याची मागणी केलेली आहे. दि.02/02/2021 च्या शासन निर्णयातील केलेल्या सुधारणा खालील प्रमाणे

**<u>शासन निर्णय</u>**.-

1. **घरबांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा**.-

घरबांधणी विषयक विविध प्रयोजनांसाठी मनपा कर्मचा-यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याकरीता सातव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतन विचारात घेण्यात यावे.अशा वेतनावर आधारीत घरबांधणी अग्रिम मंजूरीकरीता महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाच्या क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५, दि.१६ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या (तसेच त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणानुसार) "एक्स", "वाय" व त्याव्यतिरिक्त उर्वरीत वर्गीकरणातील शहरामध्ये घर/सदनिका/जमीन खरेदीसाठी सुधारीत कमाल मर्यादा पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | अग्रिमाचा तपशिल | घरबांधणी अग्रिमाच्या रकमेची कमाल मर्यादा |
|---|---|---|
| | | "**एक्स**" वर्गीकरण |
| अ) | १) जमीन खरेदी करुन त्यावर विहित कालावधीत घर बांधणे किंवा २) स्वत:च्या मालकीच्या जागेवर नवीन घर बांधणे,किंवा ३) स्वत:च्या मालकीच्या जागेवरील मोडकळीस आलेले घर पाडून नवीन घर बांधणे,किंवा ४) बांधकाम चालू असलेले नवीन घर किंवा तयार नवीन घर खरेदी करणे.(घरबांधणी अग्रिम) | मूळ वेतनाच्या 1०० पट किंवा रु.7०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ब) | घर बांधण्यासाठी जमीन खरेदी करणे. (भुखंड खरेदी अग्रिम ) | मूळ वेतनाच्या 1०० पट किंवा रु.21.०० लक्ष किंवा जमिनीची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| क) | स्वत:च्या मालकीच्या राहत्या घराचे नवीन बांधकाम करुन विस्तार करणे. (घरविस्तार अग्रिम ) | मूळ वेतनाच्या १०० पट किंवा रु.२१.०० लक्ष किंवा बांधकामाची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ड) | सध्याचे राहते घर निवास योग्य करण्यासाठी घरदुरुस्ती अग्रिम (राहत्या घरात नवीन सोयी किंवा अंतर्गत सजावट करणे यासाठी अनुज्ञेय नाही ) | मूळ वेतनाच्या ५० पट किंवा रु.१०.५० लक्ष किंवा घरदुरुस्तीचा खर्च किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| इ) | हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन (H.D.F.C.) , राष्ट्रीयकृत बॅंका/सहकारी बॅंका,महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशन व तत्सम शासन मान्य वितीय संस्थाकडून घरबांधणीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी | अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला शिल्लक असलेची कर्जाची रक्कम किंवा मूळ वेतनाच्या १०० पट किंवा रु.७०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |

| | | |
|---|---|---|
| फ) | जुने घर विकत घेण्यासाठी अग्रिम | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी ( Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत किंवा मूळ वेतनाच्या १०० पट किंवा रु.७०.०० लक्ष किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |

उक्त शासन निर्णयातील सुत्रानुसार सातव्या वेतन आयोगानुसार महापालिका कर्मचा-यांना खालीलप्रमाणे अटी व शर्तीनुसार घरकर्ज मंजूर करावे लागेल.

२) **घरबांधणी अग्रिमाची वसुली**.-

अ) अग्रीमाची व्याजासह वसूली सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल अशा पध्दतीने वरील अ,इ आणि फ येथील प्रयोजनाकरीता कमाल २० वर्षात प्रथम १९२ मासिक हस्यात मूळ अग्रिम व नंतर ४८ मासिक हस्यात व्याज वसूल करण्यात यावे ब ,क आणि ड येथील प्रयोजनासाठी घेतलेल्या अग्रिमाची वसूली व्याजासह कमाल ९६ मासिक हस्यात प्रथम ७२ मासिक हस्यात मूळ अग्रिम व नंतर २४ मासिक हस्यात व्याजाची रक्कम वसूल करण्यात यावी. अग्रिम धारक त्याच्या इच्छेनुसार कमी कालावधीत अग्रिम व व्याजाची रक्कम फेडण्यासाठी मासिक हस्याची रक्कम वाढवू शकेल. अग्रीमधारकाचा सेवा कालावधी उपरोक्त नमूद कालमर्यादेपेक्षा कमी शिल्लक आहे अशा प्रकरणी,उर्वरीत सेवा कालावधी विचारात घेऊन मुद्दल व व्याज वसुली सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल या दृष्टीने मुद्दल व व्याजाचा वसुली कालावधी निश्चित करण्यात यावा.

ब) घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकरकमी मंजूर केली असल्यास अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाची रक्कम वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात येईल. घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हस्यात मंजूर केली असल्यास अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाचा प्रथम हप्ता वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात येईल.

३) अग्रिम मंजूरीसाठी मनपाचे यापुर्वीच्या दि .05/08/2016 च्या परिपत्रकातील अट क्र.१ ते १८ आहे तशा लागू राहतील

४) **अग्रिम परतफेडीच्या क्षमतेची परिगणना पुढील प्रमाणे करण्यात यावी.**

| अ.क्र. | राहिलेल्या शासन सेवेची मर्यादा | परतफेडीची क्षमता |
|---|---|---|
| १. | २० वर्षानंतर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत | मूळ मासिक वेतनाच्या 100 टक्के X मासिक सेवा कालावधी |
| २. | १० वर्षानंतर परंतू २० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत. | मूळ मासिक वेतनाच्या 90 टक्के X मासिक सेवा कालावधी |
| ३. | १० वर्षाच्या आत सेवानिवृत्त होण-या तथापि सेवानिवृत्तीसाठी किमान ५ वर्षे सेवा कालावधी शिल्लक असणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत | मूळ मासिक वेतनाच्या 80 टक्के X मासिक सेवा कालावधी |

५) व्याज दराबाबत अन्य आदेश निर्गमित होईपर्यंत या आदेशान्वये र.रु.25.00 लक्ष पर्यंतच्या घर बांधणी प्रकरणी व्याजाची परिगणना 7.9% दराने करावी व र.रु.25.00 लक्ष वरील मंजूर अग्रीमाच्या बाबतीत मात्र संपुर्ण मंजूर अग्रिम रकमेवर व्याजाची परिगणना 9.9% या एकरुप दराने करण्यात यावी. ज्या आर्थिक वर्षात घरबांधणी अग्रिम मंजूर केले असेल त्या आर्थिक वर्षासाठी जो व्याजदर लागू करण्यात आला असेल त्या दराने व्याजाची परिगणना करण्यात यावी. व्याजाची परिगणना वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अग्रिम-१०९९/प्र.क्र.४९/९९/विनियम, दि.५ मे, २००० मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने करण्यात यावी.

६) शासन निर्णयातील सुधारीत मर्यादा आदेश निर्गत केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि ज्या अधिकारी/कर्मचा-यांना दि.05/08/2016 च्या मनपा आदेशान्वये घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हप्त्यात मंजूर केली असेल व अग्रीमधारकास या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत अग्रीमाचे सर्व हप्ते वितरीत केले नसतील अशा प्रकरणी संबंधित अग्रीम धारकास सदर शासन निर्णयानुसार विहीत सर्व अटी/शर्तीच्या अधीन वाढीव अग्रीम अनुज्ञेय करता येईल. या व्यतिरिक्त यापूर्वी मंजूर करण्यात आलेली घरबांधणी अग्रिमाची प्रकरणे पुन्हा नव्याने उघडण्यात येणार नसल्याने वाढीव घरबांधणी अग्रिम मंजूर केले जाणार नाही.

सबब शासन निर्णय व मनपा धोरणात नमुद केल्यानुसार उपरोक्त घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१७२ विषय क्रमांक – २१
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/१६०/२०२१, दि.२६/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

उद्यान स्थापत्य, बी.आर.टी.एस विभागामार्फत विकसित करणेत आलेले आहे. मौजे, पिंपळे सौदागर येथील कोकणे चौक ते काटे पाटील चौकापर्यंत उच्च क्षमता द्रुतगती मार्गाचे क्षेत्रामध्ये जॉगींग ट्रॅक, वृक्षारोपण (लिनिअर अर्बन गार्डन) देखभाल करणेकामी उद्यान विभागाकडे हस्तांतरीत करणेत आले आहे. देखभाल व संरक्षणकामी निविदा नोटीस क्र.३/२/२०२०-२१ प्रसिध्द करणेत आली होती. सदरची निविदा काही कारणास्तव रद्द करणेत आली आहे. त्यामुळे सदर उद्यानाचे देखभालीचे कामकाज करणेकामी विभागाकडे कर्मचारी वर्ग अपुरा असल्यामुळे निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत ३ महिने अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मे.गार्डन गुरूज फार्म अँन्ड नर्सरी यांना देणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामी सदर उद्यानाचे देखभाल व संरक्षणकामी ४२७६० चौ.मी (उद्यान क्षेत्र ३२७९२ चौ.मी) ९२१९ चौ.मी क्षेत्रावर गजेबो, प्लाझा एरीया, पाथवे, स्वच्छतागृह साफसफाई करणेकामी मजुर कर्मचारी (२ कर्मचारी) याकामी येणारा प्रति महा र.रू.४,३७,५७०/- खर्च येणार असुन त्यानुसार ३ महिने

कालावधीसाठी येणा-या अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंतच्या येणा-या प्रत्यक्ष खर्चास व त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१७३ विषय क्रमांक – २२

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मातंवि/५/कावि/१२०/२०२१, दि.३०/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महानगरपालिकेच्या विविध ४० लसीकरण केंद्रासाठी तसेच प्रत्येक रुग्णालय येथे कोविड-19 पोर्टल/ पिंपरी चिचंवड महानगरपालिकेचे डॅशबोर्ड /आयसीएमआर पोर्टल इ. ठिकाणी माहिती अद्ययावत करणेकामी आणि शासनास देण्यात येणारा अहवाल तयार करणेकामी ०८ रुग्णालयांच्या ठिकाणी डेटा एन्ट्रीचे कामकाजाकरीता ३ महिने कालावधीसाठी डेटा एन्ट्री ऑपरेटरची नेमणूक करणे आवश्यक आहे. सदर कमाकाजाकरिता प्रति डेटा एन्ट्री ऑपरेटर प्रति महिना र.रू.१९,७०५/- (अखरी र.रु.एकोणीस हजार सातशे पाच फक्त) एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर दर निश्चित करुन उपरोक्त कामकाजासाठी सदर दराने एकूण ४० डेटा ऐंट्री ऑपरेटर आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन घेणे शक्य आहे. त्यानुसार एकूण ४० डेटा ऐंट्री ऑपरेटरसाठी ३ महिने कालावधी करिता एकूण र.रु.२३,६४,६००/- (अक्षरी र.रू. तेवीस लाख चौसष्ठ हजार सहाशे फक्त) इतक्या खर्चाचे आदेश देण्यात आलेले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१७४ विषय क्रमांक – २३

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/४४८/२०२१, दि.२६/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.19/7/2020-21 अन्वये कासारवाडी मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.5 मधील जय महाराष्ट्र चौक, हुतात्मा चौक परिसरात मलवाहीनीची सुधारणा कामे करणेकामी मे.कपिल कन्ट्रक्शन नि.र.रू.29,96,365/- (अक्षरी र.रु. एकोणतीस लाख शहान्नव हजार तीनशे पासष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,96,365/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,96,365/- पेक्षा 36.99% कमी म्हणजेच र.रु.18,88,010/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.16,679/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.19,04,689/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट

दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१७५ | विषय क्रमांक – २४

दिनांक – १५/०४/२०२१ | विभाग – जलनिःसारण मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/४४९/२०२१, दि.२६/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.19/2/2020-21 अन्वये स्पाईन रस्त्याच्या दक्षिणेकडील परिसरातील जलनिःसारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकामी मे.एस.के.भोसले कॉन्ट्रॅक्टर नि.र.रू.44,78,330/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख अठ्याहत्तर हजार तीनशे तीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,78,330/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,78,330/- पेक्षा 31% कमी म्हणजेच र.रु.30,90,048/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.9,178/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.30,99,226/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१७६ | विषय क्रमांक – २५

दिनांक – १५/०४/२०२१ | विभाग – स्थापत्य ह मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/५४२/२०२१, दि.३०/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.40/113/2020-21 अन्वये प्रभाग क्र.३२ मधील पवारनगर, शिंदेनगर, हिरकणी सोसायटी १, २ इ, ठिकाणी व इतर परिसरात आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक व अनुषंगिक कामे करणेकामी मे.राहुल कन्स्ट्रक्शन नि.र.रू.29,99,922/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्याण्णव हजार नऊशे बावीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,27,622/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,27,622/- पेक्षा 37.38% कमी म्हणजेच र.रु.18,33,277/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.6,501/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.19,12,078/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू

असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१७७ विषय क्रमांक – २६

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/०५/कावि/४६४/२०२१, दि.३१/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या संगणक व सर्व्हर यंत्रणेकरिता आवश्यक Anti-Virus यंत्रणा एका सपोर्ट स्टाफसह ३ वर्षांच्या वैधता कालावधीकरिता खरेदी करणेकामी ई-निविदा सुचना क्र.४७/२०२०-२१ अन्वये मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये मे.वोल्कर्सा टॆक्नो सोल्युशन्स प्रा.लि., मुंबई यांनी दर कमी करुन फेरसादर केलेली निविदा एकूण र.रु.३२,८८,०००/- ही निविदा अंदाजित एकूण र.रु.६०,३०,०००/- पेक्षा ४५.४७% ने कमी असुन लघुत्तम प्राप्त झाली असल्यामुळे स्विकृत करण्यात आली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड मनपाच्या संगणक व सर्व्हर यंत्रणेकरिता आवश्यक Anti-Virus यंत्रणा एका सपोर्ट स्टाफसह ३ वर्षांच्या वैधता कालावधीकरिता खरेदी करणेकामी मे.वोल्कर्सा टॆक्नो सोल्युशन्स प्रा.लि., मुंबई यांच्याकडून त्यांनी सादर केलेल्या दरानुसार करारनामा करुन खरेदी करणेस व खरेदी होणारा खर्च एकूण र.रु.३२,८८,०००/- (अक्षरी र.रू.बत्तीस लाख अठ्याऐंशी हजार फक्त)ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१७८ विषय क्रमांक – २७

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/२६६/२०२१, दि.३१/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा क्र.३०/३०-२०२०-२१ अन्वये प्राधिकरण गंगानगर भागातील रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे मध्ये विद्युत विषयक कामे करणेकामी मे.ओमकार इंजीनिअरीग नि.र.रू.५५,७९,०३४/- (अक्षरी र.रू. पंचावन्न लाख एकोणऐंशी हजार चौतीस फक्त) पेक्षा २७.९०% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेकरीता मंजूरीकामी ठेवणे आवश्यक आहे. सबब, उपरोक्त निविदांपैकी मे.ओमकार इंजीनिअरीग या ठेकेदाराची निविदा, निविदा रकमेच्या २७.९०% कमी, ही सर्वात कमी दराची असल्याने स्विकृती करणेबाबत मा.अति.आयुक्त(१) यांनी दि.३१/३/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.ओमकार इंजीनिअरीग यांचेकडून वरील कामाचा

करारनामा करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१७९ विषय क्रमांक – २८

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – क क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.कक्ष/स्था/प्र.क्र.८/कावि/६९/२०२१, दि.३०/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.८ येथील सेक्टर २ मध्ये ओपीडी इमारत बांधणे या कामाचा सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेत आलेला आहे. सदरचे काम करणेबाबत स्थानिक नगरसेवक मागणी करीत आहेत. सदर काम करणेसाठी इमारतीचे विस्तृत नकाशे तयार करुन बांधकाम परवानगी घेणे व अंदाजपत्रक तयार करणे काम चालु झालेनंतर कामावर दररोज देखरेख करणे इ. कामे करावी लागणार आहे. सद्यस्थितीत सदरची सर्व कामे करणेसाठी या विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्यासाठी निविदा पुर्व व निविदापश्चात या कामासाठी वास्तुविशारदाची नेमणुक करणे आवश्यक वाटते. त्या दृष्टीकोनातून या विभागामार्फत सदर कामासाठी निविदा पुर्व व निविदा पश्चात वास्तुविशारदाची नेमणुक करणेकामी मनपाच्या अधिकृत वेबसाईट वर दि.२६/०२/२०२१ रोजी मनपाच्या पॅनलवर असणारे वास्तुविशारद कडून दर पत्रक मागविणे बाबतची नोटिस प्रसिध्द करणेत आली आहे. त्यानुसार सदर कामासाठी ३ सिलबंद कोटेशन प्राप्त झाली आहेत. त्यामधील प्रस्तावात नमूद प्रमाणे सर्वात कमी दर निविदा पुर्व व निविदा पश्चात १.८८% इतका M/s.Dream Designer Architects यांचा प्राप्त झालेला आहे. सदरचा दर हा मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३९ दि.७/२/२०१८ अन्वये मान्य करणेत आलेल्या दरापेक्षा लघुत्तम दर प्राप्त झालेला असलेने सदर कामासाठी निविदा पुर्व व निविदा पश्चात १.८८% असे दरानुसार फि अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१८० विषय क्रमांक – २९

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – उद्यान

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/१७६/२०२१, दि.३०/०३/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.६/२०२०-२१ अन्वये मनपाचे यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यानांमध्ये गुलाब व इतर शोभिवंत रोपे लागवड करणे कामाबाबत मे.सदिच्छा कन्स्ट्रक्शन या ठेकेदारांची निविदा र.रू.८,५५,५९४/- (अक्षरी र.रु.आठ लाख पंच्चावन्न हजार पाचशें चौ-याण्णव फक्त) पेक्षा -३.००% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन महिने कालावधीसाठी येणारा खर्च र.रू.८,२९,९२६/- (अक्षरी र.रु.आठ लाख एकोणतीस हजार नऊशे सव्वीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस

अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१८१ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वायसीएमएच

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.रूग्ण/१८/कावि/१६६/२०२१, दि.२५/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरणेत आलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या वाहनचालक या पदास सुधारीत किमान वेतन दराप्रमाणे किमान वेतन व कोविड-१९ चे कामकाजाकरीता कोविड कालावधीपुरता कोविड भत्ता अदा करणेबाबत मान्यता दिलेली आहे. तरी यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता अस्थायी स्वरूपात नियुक्ती दिलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या तसेच यापुढील कालावधीत नेमावयाच्या खालील तक्त्यातील मानधन वाहनचालक पदास किमान वेतन व कोविड कालावधीपुरता अदा करावयाचे कोविड भता यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे नमुद केला आहे.

| अ.क्र | कामगाराचे पदनाम व त्यांची वर्गवारी | सध्या किमान वेतन दरानुसार दरमहा देणेत येत असलेले मानधन र.रूपये (३) | सुधारीत किमान वेतन दरानुसार दरमहा अदा करावयाचे मानधन र.रू | कोविड-१९ चे कालावधी करीता द्यावयाचा केविड भत्ता र.रूपये | सुधारीत किमान वेतन + कोविड भत्ता याप्रमाणे द्यावयाची दरमहा रक्कम (४+५) =६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | कुशल कामगार | | | | |
| १ | वाहनचालक | २४,८९८/- | २२,९३४/- | २०००/- | २४,९३४/- |

पिंपरी चिंचवड मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणुक करणेत आलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या वाहनचालक पदास सुधारीत किमान वेतन दरानुसार रकाना क्र.४ मध्ये नमुद केलेप्रमाणे किमान वेतन व कोविड-१९ चे कामकाजाकरीता कोविड कालावधीसाठी रकाना क्र.५ मध्ये नमुद केलेप्रमाणे कोविड भत्ता याप्रमाणे मानधनावाढ माहे जुन २०२० पासून अदा करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१८२ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/३१३/२०२१, दि.२४/०३/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग फ मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (1 ते 2) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१८३ विषय क्रमांक – ३२
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/४३९/२०२१, दि.२६/०३/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (१ ते १) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१८४ विषय क्रमांक – ३३
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/४५२/२०२१, दि.२६/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र "अ" मधील (1 ते 2) निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असून मंजूर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१८५ विषय क्रमांक – ३४
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.फक्षेका/नि-४/कावि/२०४/२०२१, दि.२४/०३/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 13) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१८६ विषय क्रमांक – ३५

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – पदव्युत्तर संस्था YCMH

सुचक – मा.निता पाडाळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/कावि/७/१०१/२०२१, दि.३१/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२ दि.४ मार्च २०१४ अन्वये ९ विषयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झालेला आहे. MD Respiratory Medicine, MD Community Medicine, MD Dermatology Venereology and Leprosy, MS Ophthalmology हे नविन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करणेकरिता पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्या प्रस्तावास अनुसरून ४ विषयांसाठी आवश्यकता प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. खालील विषयांसाठी विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्र ३ वर्षा करीता देण्याची कार्यवाही सुरू आहे.

| अ.क्र. | विषय | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | MD Respiratory Medicine | ०६ |
| २ | MD Community Medicine | ०६ |
| ३ | MD Dermatology Venereology and Leprosy | ०६ |
| ४ | MS Ophthalmology | ०६ |

नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करणेकरीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकयांनी पत्र क्र.मआविवि/पीबी/पीजी/पी-१/३३९/२०२१, दिनांक-०९/०३/२०२१ अन्वये एकुण ४ विषयासाठी विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्राचे (Consent of Affiliation) मुदतवाढ करणेसाठी शुल्क भरावे लागणार आहेत. त्यानुसार भारतीय आयुर्विज्ञान आयोग यांच्या नियमानुसार विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्र (Consent of Affiliation) तीन वर्ष वैध असणे आवश्यक आहे. सदर संमतीपत्र एक वर्ष शुल्क माफ व अतिरीक्त दोन वर्ष वैध करून देणेसाठी, विद्यापीठ शैक्षणिक अधिसुचना क्र.४२/२०१७, मधील तरतूद मधील मुद्दा क्रमांक ११ नुसार असलेले प्रती वर्ष प्रती विषय र.रू.१,००,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख फक्त) या प्रमाणे चार वर्षासाठी प्रति विषय र.रू.२,००,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख फक्त) या प्रमाणे चार विषयासाठी र.रू.२,००,००० x ४= र.रू.८,००,०००/- (अक्षरी र.रू.आठ लाख फक्त) इतके वाढीव वैधता शुल्क विद्यापीठास भरणे आवश्यक आहे. भारतीय आयुर्विज्ञान आयोगाच्या नियमानूसार वर नमूद केल्यानुसार विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्र (Consent of Affiliation) दोन अतिरिक्त वर्षासाठी शुल्क र.रू.८,००,०००/- मा.कुलसचिव यांचे नावे नाशिक येथे देय असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएस/ऑनलाईन पेमेंट केल्याची पावतीसादर करणेबाबत विनंती केली आहे. सदर पावती सादर केल्यावर विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्र (Consent of Affiliation) देण्याची कार्यवाही करणे सुकर होणार आहे. सबब, उपरोक्तकामी ४ विषयांचे एकुण र.रू.८,००,०००/- (अक्षरी र.रू.आठ लाख फक्त) विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्र (Consent of Affiliation) दोन अतिरिक्त वर्षासाठी शुल्क र.रू.८,००,०००/- मा.कुलसचिव यांचे नावे नाशिक येथे देय असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएस/ऑनलाईन पेमेंट द्वारे

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक/यांना अदा करणेकामी यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकडील सुधारीत अंदाजपत्रक सन २०२०-२०२१ मधील "पी.जी.आय. वायसीएमएच पिसीएमसी करीता विविध शासकीय नियामक संस्था व विद्यापीठ इ. चे शुल्क भरणे" या लेखाशिर्षातील र.रू.१,००,००,०००/- मधुन खर्ची करण्यात आलेला असल्याने मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१८७ विषय क्रमांक – ३६

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२६९/२०२१, दि.३१/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये प्रथम टप्प्यामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता खाजगी कोविड केअर सेंटर चालुकरण्याचा निर्णय मा.आयुक्त यांचे दिनांक ०८.०७.२०२० चे मान्य प्रस्तावान्वये घेणेत आला. या प्रमाणे Expression Of Interest (EOI) क्र.०३/२०२०-२१ प्रसीध्द करणेत आला होता. सदर EOI बी वर्गवारी साठी प्रसीध्द करणेत आला होता त्यामध्ये संबंधीत संस्था/ रुग्णालयांकडुन फक्त कर्मचारी पुरविणेकामी कळविले होते. या EOI मधील अटी शर्ती प्रमाणे The Minimum payment guaranteed shall be 80% occupancy irrespective of actual occupancy. For occupancy above 80% actual occupancy charges shall be payable. या प्रमाणे नमूद करण्यात आले होते. मे.आयकॉन हॉस्पिटल यांनी सदर EOI मध्ये भाग घेतला होता. त्यांनी २०० बेडसाठी र.रु.५४३/- प्रति दिन प्रती बेड या प्रमाणे दर सादर केला होता. त्यांचे दरास मा.आयुक्त यांचेकडुन २१.०७.२०२० रोजी मान्यता देणेत आलेली आहे. मे.आयकॉन हॉस्पिटल यांचे खर्चास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७४८८ दि. २३.०९.२०२० अन्वये मान्यता घेणेत आलेली होती. त्या प्रमाणे त्यांचे बरोबर करारनामा करणेत येऊन त्यांना आमुका/११/कावि/२०९/२०२० दि.०७.०८.२०२० अन्वये र.रु.९७,७४,०००/- चे २०० बेडकरीता र.र.५४३/- प्रति दिन प्रति बेड या प्रमाणे घरकुल ईमारत डी-८ चिखलीसाठी ९० दिवसांकरीता आदेश देण्यात आलेले होते. ऑक्टोबर महीन्यात कोरोना रुग्ण बाधीतांची संख्या कमी होत गेली होती म्हणुन सदर कोविड सेंटर मा.अति. आयुक्त क्र.२ यांचेकडील आदेश क्र.आमुका/११/कावि/२९१/२०२० दि. २८.१०.२०२० अन्वये बंद करणेत आलेले आहे. सध्या कार्यरत असलेले बालनगरी येथील कोविड केअर सेंटर,महानगरपालिकेने चालु केलेले ॲटो क्लस्टर येथील जंबो कोविड हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने चालु आहे. कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय २०० बेडसाठी चालु करणेत आलेले आहे. EOI क्र.०३/२०२०-२१ मधील अटी शर्ती प्रमाणे पूर्वीच्या मंजूर दराने काम करण्यात यावे अशा सुचना मा.आयुक्त, मा.महापौर यांच्या बैठकीत दिलेल्या आहेततसेच झालेल्या चर्चे प्रमाणे प्रथम डी-५ आणि डी-६ मधील एकूण ४०० बेडसाठी चालु करणेकामी आणि दोन्ही सेंटर ५०%भरलेनंतर पुढील इमारतींमध्ये कोविड केअर सेंटर (CCC) सुरु करण्याची कार्यवाही करण्यात यावी या बाबतचा सभावृत्तांत करणेत आलेला आहे. या निर्णयाप्रमाणे घरकुल येथील

इमारत क्र. डी-५ आणि डी-६ मध्ये पूर्ण क्षमतेने रुग्ण दाखल झालेले आहेत. कोविडसाठी कार्यकारणी समिती गठीत करण्यात आलेली आहे त्या समितीच्या दिनांक २३.०३.२०२१ रोजी झालेल्या मिटींग मधील निर्णया प्रमाणे आणि मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडुन सूचना प्राप्त झाल्याप्रमाणे आपत्कालीन बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे. मे.आयकॉन हॉस्पिटल यांना तातडीची बाब म्हणुन चिखली येथील घरकुल इमारत डि-८ येथे २०० बेडसाठी कोविड केअर सेंटर चालु करणे बाबत र.रु.६६,२४,६००/- (अक्षरी र.रू.सहासष्ठ लाख चोवीस हजार सहाशे फक्त) दि.२७.०३.२०२१ ते २६.०५.२०२१ पर्यंत चे कामकाज आदेश देणेत आलेले असलेने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१८८ विषय क्रमांक – ३७
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२६८/२०२१, दि.३१/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये सध्या कोरोना (कोविड-१९) रुग्ण झपाट्याने वाढत चालले आहेत. फेब्रुवारी २०२१ च्या दुस-या आठवड्या पासुन कोरोना बाधीतांची संख्या दिवसें दिवस वाढु लागलेली आहे. मा.आयुक्त यांचेकडील दि.१९.०३.२०२१ चे मान्य प्रस्तावान्वये डि -५ आणि डि-६ हे कोविड सेंटर चालु करणेत आलेले आहेत. दि.२६.०३.२०२१ रोजी दोन्ही कोविड सेंटर मिळून ३०० पेक्षा जास्त रुग्ण झाल्याने मा.अति.आयुक्त १ यांनी घरकुल येथील डी-७ आणि डी-८ हे कोविड सेंटर दोन महीन्याकरीता तातडीने चालु करणेकामी सुचना दिलेल्या आहेत. या प्रमाणे मे.आयकॉन हॉस्पिटल यांना पत्र क्र.मसाभां/४/कावि/२५०/२०२१ दि.२६.०३.२०२१ अन्वये पत्र देऊन जुन्या दराने काम करण्यास तयार आहात किंवा कसे या बाबत विचारणा करण्यात आले असता त्यांचे कडील दि.२६.०३.२०२१ अन्वये पत्रान्वये जुन्या दराने काम करण्यास तयार असले बाबत कळविले आहे. भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असेलेने मे.आयकॉन हॉस्पिटल यांना चिखली येथील इमारत क्र. डी – ७ येथील कोविड सेंटर दि.२७.०३.२०२१ ते २६.०५.२०२१ पर्यंत (६१ दिवस) दोन महीने २०० बेड पर्यंत कोविड केअर सेंटर चालविणेस देणे बाबत र.रु.६६,२४,६००/- चे कामकाज आदेश EOI क्र.०३/२०२०-२१ मधील अटी शर्ती आणि करारनाम्यास अधीन राहून पूर्वीच्या मंजूर दराने देणेत आला असलेने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१८९ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/८०३/२०२१, दि.३०/०३/२०२१

विषय - आरक्षण क्र.२२१ येथे बहुउद्देशिय क्रिडांगण विकसित करणेबाबत.

विषय क्र.३८ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१९० विषय क्रमांक – ३९

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/५४४/२०२१, दि.०१/०४/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.40/105/2020-21 अन्वये प्रभाग क्र.३२ मध्ये ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.राहूल कन्स्ट्रक्शन नि.र.रू.29,99,892/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्यान्नव हजार आठशे ब्यान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,27,592/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,27,592/- पेक्षा 37.38% कमी म्हणजेच र.रु.18,33,258/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.6,501/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.19,12,059/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१९१ विषय क्रमांक – ४०

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/५४३/२०२१, दि.०१/०४/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.40/109/2020-21 अन्वये प्रभाग क्र. ३२ मधील सांगवी गावठाण गंगानगर परिसरात व इतर ठिकाणी आवश्यकते नुसार स्थापत्य विषयक व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.राहुल कन्स्ट्रक्शन नि.र.रू.29,99,982/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्यान्नव हजार नऊशे ब्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,27,682/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम

उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,27,682/- पेक्षा 37.38% कमी म्हणजेच र.रु.18,33,314/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.6,501/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.19,12,115/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ९१९२ विषय क्रमांक – ४२
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – क क्षेत्रिय
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेकावि/जा/१५०/२०२१, दि.०५/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

अ क्षेत्रिय कार्यालय पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत “कोविड-१९ महामारीचे नियंत्रण करिता मनपातर्फे ऑटोक्लस्टर येथे उभारण्यात येणा-या जम्बो हॉस्पिटल मधील जुन्या वातानुकुलन यंत्रणेचे स्पेअरपार्ट पुरविणे, तसेच वाढीव क्षमतेचे वातानुकुलित यंत्रणा बसविणे व विद्युत विषयक अनुषंगिक कामे करणे (नि.नो.क्र.२९/१/२०२०-२१)” चे काम सद्यस्थितीत मे.ग्रीनलिंक इन्फ्रा यांचेमार्फत चालू असून निविदा दर २२.२९% कमी आहे. त्यास मा. स्थायी समिती ठराव क्र.८२७० दि.२७/०१/२०२१ अन्वये मान्यता मिळाली आहे. कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम जम्बो कोविड हॉस्पिटल येथे oxygen bed करिता 150m x 40m = 6,000 sq.m म्हणजेच ६०,००० स्क्वे. फीट जागेसाठी १०० स्क्वे. फूटास एक टीआर याप्रमाणे ६०० TR वातानुकुलन यंत्रणा आवश्यक आहे. टेन्ट ची उंची व छत लक्षात घेता सदर ठिकाणी मे.जेस आयडिया प्रा. लि. मार्फत यापूर्वी ६८० TR वातानुकुलन यंत्रणा बसविणेत आली आहे. सदर हॉस्पिटल चालू असताना पावसाळा व हिवाळा असल्यामुळे ६८० TR वातानुकुलन यंत्रणा बसविणेत आली होती. सद्यस्थितीत कडक उन्हाळा चालू असून हॉस्पिटलचे छत व भिंत PVC Tensile Fabric Covers असल्याने छत तापून आतमध्ये दु.१२ ते ४ या वेळात प्रचंड उष्णता तयार होत आहे. सदर उष्णतेमुळे सध्या बसविणेत आलेली A.C. ची यंत्रणा कमी पडत आहे. त्यामुळे पेशंट व डॉक्टरच्या तक्रारी येत आहे. सदर बाब लक्षात घेता सदर ठिकाणी ६० स्क्वे. फूटास एक टीआर याप्रमाणे १०००TR ची आवश्यकता आहे. यापुर्वी मे.जेस आयडिया प्रा. लि. यांनी ६८० TR क्षमतेची वातानुकुलन यंत्रणा बसविली असल्याने उर्वरीत ३२० TR ची वाढीव वातानुकुलन यंत्रणा ताटाडीने बसविणे आवश्यक आहे. याकामी मा. आयुक्त सो. व जम्बो समन्वय अधिकारी यांनी आवश्यक यंत्रणा बसविणेकामी सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार अण्णासाहेब मगर स्टेडियम जम्बो कोविड हॉस्पिटल येथे वातानुकुलन यंत्रणा बसविणेसाठी २४० TR एवढी जागा उपलब्ध असलेने वाढीव २४० TR वातानुकुलन यंत्रणा बसविणे आवश्यक

आहे. जनरेटर व्यवस्था, तसेच ICU करिता बसविणेत आलेल्या AHU UNIT मधील HEPPA Filter बदलणे ही कामे तातडीने करून घेणे अत्यावश्यक आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता र.रू.१,३६,३२,४७९/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम विषयांकीत चालू कामातून २२.२९% कमी दराने असल्याने व याच प्रकारचे काम असल्याने त्या कामातून ३ महिने कालावधीसाठी करावे असा इकडील प्रस्ताव आहे. त्यामुळे मुळ सदर कामांस व खर्चास मा.स्थायी समिती सभेची (वाढीव) सुधारीत मान्यता घ्यावी लागणार आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, दि.13/03/2020 पासुन लागू केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम 63(3) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू अथवा सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात मध्यवर्ती भांडार विभागाकडील "कोरोना निधी (COVID-19)" हे लेखाशिर्ष नव्याने निर्माण करणेत आले आहे. याच लेखाशीर्षातून सदर कामाचा खर्च करणेत येणार आहे. सदर कामाची तातडीक विचारात घेता उपरोक्त चालू निविदा कामामधून वाढीव र.रू.१,३६,३२,४७९/- इतक्या रक्कमेचे काम मे.ग्रीनलिंक इन्फ्रा याचेकडून २२.२९% कमी या दराने करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे,

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१९३ विषय क्रमांक – ४३

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्य.सा.भां., वैद्यकिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३७४/२०२१, दि.०६/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रण अनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) यास अधिन राहून कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी तसेच कोवीड १९ आजाराचे पार्श्वभुमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता सद्यस्थितीत एका लसीकरण केंद्राकरीता २ स्टाफनर्स, १ डाटाएन्ट्री ऑपरेटर, १ वॉर्डबॉय/वॉर्डआया याप्रमाणे ५० कोविड लसीकरण केंद्राकरीता २०० कर्मचा-यांची आवश्यकता आहे. ५० कोविड लसीकरण केंद्र उभारणेच्या व याकामी महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्थेमार्फत दोन महीने कालावधीकरीता मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेबाबत मा.आयुक्त साहेब यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार एका लसीकरण केंद्राकरीता २ स्टाफनर्स ,१ डाटाएन्ट्री ऑपरेटर, १ वॉर्डबॉय/ वॉर्डआया याप्रमाणे ५० कोविड लसीकरण केंद्राकरीता खालीलप्रमाणे मनुष्यबळाची आवश्यकता आहे. कोवीड १९ आजारास प्रतिबंध घालणे करीता कोविड लसीकरण,कॉन्टॅक्ट ट्रेसिंग, रॅपीड अँटीजेन /आरटीपीसीआर टेस्टींग, वॉररुम कामकाज , विलगीकरण कक्ष, नव्याने सुरु होणारे

कोविड केअर सेंटर, तसेच कोविड-१९ चे अनुषंगाने सर्व कामकाज करणेकामी विविध तांत्रिक संवर्गातील पदांची आवश्यकता आहे. वैद्यकीय विभागामार्फत लसीकरण केंद्राकरीता आवश्यक लागणारे ५० वैद्यकीय अधिकारी मानधन भरती प्रक्रीयेमार्फत उपलब्ध करुन देता येतील . परंतु स्टाफनर्स, डाटा एन्ट्री ऑपरेटर, वॉर्डबॉय/वॉर्डआया या संवर्गातील २०० पदे नोंदणीकृत संस्थेमार्फत उपलब्ध करुन दयावी लागणार आहे. महाराष्ट्र शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्र.काआआ-२०१३/प्र.क्र.२३३/कामगार-८ दि.१८/०६/२०१४ अन्वये कामगार आयुक्त कार्यालयाच्या अंतर्गत असणा-या विविध कार्यालये तसेच नियंत्रणाखालील विविध मंडळे व अन्य क्षेत्रिय कार्यालयातील गट क व गट ड या पदांची कामे बाहययंत्रणेमार्फत पुरविणा-या २ सेवापुरवठादारांचे पॅनल तयार करण्यात आले आहे. मे.ब्रिक्स फॅसिलिटिज प्रा. लि. व मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि. या दोन निविदाधारकांचे पॅनलला तीन वर्षाकरीता मंजुरी देणेत आली आहे. प्रस्तुत कामासाठी १४% इतका सेवाशुल्काचा दर मान्य करणेत आला आहे. तदनंतर महाराष्ट्र शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्र. काआआ-२०१३/प्र.क्र.२३३/काम-८ दि.१७/०८/२०२० अन्वये सदर एजन्सीची ३ वर्षाची मुदत संपुष्टात आली असुन या एजन्सीला पुढे ३ महीने किंवा ई- निविदा प्रक्रीया राबवून नवीन यंत्रणा नियुक्त होईपर्यंत मुदतवाढ देण्यात दि.११/९/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे. नवीन पॅनलला मंजुरी देणेबाबतची प्रक्रीया अद्याप पुर्ण झालेली नसल्याने सदर मुदतवाढ अद्याप सुरु आहे असे सदर शासन निर्णयात नमुद केले आहे. त्यानुसार अद्यापपर्यंत महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण , महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, दि. महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय-अकोला, उपसंचालक आरोग्यसेवा नाशिक मंडळ- नाशिक यांचेमार्फत दि.१८/६/२०१४ रोजीचे शासन निर्णयानुसार नियुक्ती केलेल्या पॅनलमधील सेवापुरवठाधारकास मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेकामी कामाचे आदेश देण्यात आले आहेत. उक्त नमुद दि. १८/६/२०१४ रोजीचे शासन निर्णयानुसार मंजुरी देणेत आलेल्या पॅनलमधील मे. ब्रिक्स फॅसिलिटिज प्रा. लि. व मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि. या दोन सेवा पुरवठाधारकाकडुन वैद्यकीय अधिकारी वगळता उर्वरित स्टाफनर्स, डाटाएन्ट्री ऑपरेटर, वॉर्डबॉय/वॉर्डआया संवर्गातील २०० कर्मचारी यांना दोन महीने कालावधीकरीता किमान वेतन दरानुसार वेतन व १४ %सेवाशुल्कासह उपलब्ध करुन घेणेबाबत दिनांक ०१/०४/२०२१ रोजी मा.आयुक्त साहेब यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा.आयुक्त साहेब यांनी मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने मे. ब्रिक्स फॅसिलिटिज प्रा.लि. व मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि. यांना ई-मेल पाठवून काम करण्यास तयार आहात किंवा कसे ? याबाबत विचारणा करण्यात आली होती. संबंधितांनी प्रस्तुत प्रकरणी ई-मेलद्वारे सहमती दर्शविलेली आहे. ५० कोविड लसीकरण केंद्राकरीता १०० स्टाफनर्स, ५० डेटाएन्ट्री ऑपरेटर, ५० वॉर्डबॉय/ वॉर्डआया असे एकुण २०० कुशल /अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. दि.१८/०६/२०१४ रोजीचे शासन निर्णयातील एजन्सीचे पॅनेल मधील मे. ब्रिक्स फॅसिलिटिज प्रा.लि. व मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि. या सेवा पुरवठाधारकामार्फत पुरविणेत आलेल्या कुशल व अकुशल कर्मचा-यास किमान वेतनदरानुसार वेतन व दि.१८/०६/२०१४ रोजीचे शासन निर्णयानुसार १४ % सेवाशुल्कासह मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेबाबत कामगार कल्याण विभागाचा अभिप्राय घेणेत आलला आहे. मा.कामगार

कल्याण अधिकारी यांनी दिनांक ०५/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये किमान वेतन दराबाबत अभिप्राय दिलेला आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे नेमावयाच्या मनुष्यबळास खर्च अपेक्षित आहे.

| अक्र. | पदनाम | संख्या | प्रति महा किमान वेतन दर र.रु. | प्रति महा किमान वेतन दराप्रमाणे प्रति महा र.रु. | प्रति महा किमान वेतन दराप्रमाणे २ महिन्यांकरीता खर्च र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफनर्स | १०० | २६,१७१/- | २६,१७,१००/- | ५२,३४,२००/- |
| २ | डेटाएन्ट्री ऑपरेटर | ५० | २६,१७१/- | १३,०८,५५०/- | २६,१७,१००/- |
| ३ | वॉर्डबॉय/ वॉर्डआया | ५० | २३,१११/- | ११,५५,५५०/- | २३,११,१००/- |
| | | एकूण खर्च र.रु. | | ५०,८१,२००/- | १,०१,६२,४००/- |

५० कोविड लसीकरण केंद्राकरीता १०० स्टाफनर्स, ५० डेटाएन्ट्री ऑपरेटर, ५० वॉर्डबॉय/ वॉर्डआया असे एकुण २०० कुशल /अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता असून उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे प्रति महा र.रु.५०,८१,२००/- प्रमाणे २ महिने कालावधीकरीता र.रु.१,०१,६२,४००/- इतका अपेक्षित खर्च आहे. सदर खर्च मध्यवर्ती भांडार विभागाकडील "कोवीड निधी" या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतुदीमधून भागविणे शक्य आहे. सदरचे खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.सबब, भारतीय साथरोग नियंत्रण अनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) (क) यास अधिन राहून कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी व शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१५/प्र.क्र.५४५/नवि/दि. ३०/०८/२०१९ चे शासन निर्णयास व त्यांचे अटी-शर्तीस अधिन राहून मे. ब्रिक्स फॅसिलिटिज प्रा. लि. व मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि. यांचेकडून ५० कोविड लसीकरण केंद्राकरीता की ५० स्टाफनर्स, २५ डेटाएन्ट्री ऑपरेटर, २५ वॉर्डबॉय/वॉर्डआया असे एकुण १०० कुशल /अकुशल मनुष्यबळाची प्रति महा र.रु.२५,४०,६००/- प्रमाणे २ महिने कालावधीकरीता र.रु.५०,८१,२००/- व मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि. यांचेकडून ५० कोविड लसीकरण केंद्राकरीता की ५० स्टाफनर्स, २५ डेटाएन्ट्री ऑपरेटर, २५ वॉर्डबॉय/ वॉर्डआया असे एकुण १०० कुशल/अकुशल मनुष्यबळाची प्रति महा र.रु.२५,४०,६०००/- प्रमाणे २ महिने कालावधीकरीता र.रु.५०,८१,२००/- प्रमाणे करारनामा करुन नेमणुक करणेकामी येणा-या एकूण र.रु.१,०१,६२,४००/- चे खर्चास तसेच यापुढे आवश्यक लागणारे कुशल व अकुशल कर्मचारी नेमण्याकरीता मंजुर दराने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१९४ विषय क्रमांक – ४४

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/१७/कावि/८७/२०२१, दि.०१/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम रुग्णालयातील क्ष- किरण विभागातील डी-आर सिस्टीम करिता आवश्यक विविध प्रकारच्या साईजमध्ये Carestream Dry View DVE Laser Imaging कंपनीच्या एक्स– रे फिल्म खरेदी करुन देणेकामी मागणी केलेली आहे. वायसीएम रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरिता डी-आर सिस्टीम करिता असलेल्या प्रिंटरला केवळ Carestream Dry View DVE Laser Imaging कंपनीच्या फिल्म वापरात येत असलेने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन m/s. Carestream Healh India.Private Limited मुंबई या कंपनी कडुन मेलव्दारे प्राप्त झालेल्या दरपत्रकानुसार एकुण मुळ र.रु.27,56,696/- (अक्षरी र.रु. सत्तावीस लाख छपन्न हजार सहाशे शहान्नव फक्त) अधिक 12 टक्के जीएसटी या प्रमाणे कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.लॉजीक हेल्थ केअर सर्व्हीस प्रा.लि. पुणे यांचेकडून थेट पध्दतीने खरेदी करणे चे खर्चास व कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.लॉजीक हेल्थ केअर सर्व्हीस प्रा.लि.पुणे यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१९५ विषय क्रमांक – ४५
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.निता पाडाळे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/४९१/२०२१, दि.०६/०४/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.15-02/2020-2021 अन्वये "क" क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत कोविड-19 आपात्कालीन उपायजोजना Isolation Bed Management (IBM) करीता मनपा इमारतीमध्ये करणेत येत असलेल्या CCC साठी CCTVयंत्रणा, डिझेल जनित्रसंच तसेच इतर अनुषांगिक कामे करणे या कामाकरीता मे.कमल इलेक्ट्रीक एन्टरप्रायजेस निविदा र.रु.41,98,786/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस लाख अठ्ठयाण्णव हजार सातशे शहाऐंशी फक्त) पेक्षा -14.28% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१९६ विषय क्रमांक – ४६
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२८८/२०२१, दि.०४/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या कोविड केअर सेंटर(CCC) खाजगी रुग्णालय सेंटर/ एन. जी. ओ. /खाजगी संस्था यांना चालविणेस देणेकामी तसेच खाजगी ठिकाणी संस्थामार्फत (CCC) चालविणेस देणेबाबत Expression of Interst (EOI) क्र.03/2020-21मनपा वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आलेले होते. तसेच सदर कामाचा कालावधी

हा ३ महिन्यांकरीता होता. त्याअनुषंगाने सी कॅटेगरी मधील बेडचे संख्येनुसार दर सादर करणेकामी EOI मागविणेत आले होते. त्यानुसार निविदाकार यांना विभागामार्फत वारंवार पत्रांद्वारे दर कमी करणेबाबत विचारणा करणेत येवून,र.रु.८५०/- चे दरानुसार काम देणेस दि.३१/०८/२०२० रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता देणेत आलेली आहे.ऑक्टोबर -२०२० मध्ये रुग्णसंख्या कमी होत गेले नंतर १५ ऑक्टोबर पासुन इतर सर्व कोविड सेंटर बंद करण्यात येऊन सर्व रुग्ण बालनगरी येथील कोविड सेंटर मध्ये पाठविण्यात आले होते. फेब्रुवारी-२०२१ मध्ये कोरोना रुग्णसंख्या झपाट्याने वाढत गेल्यामुळे इतर कोविड सेंटर चालु करण्यात आले आहेत. त्याच प्रमाणे बालनगरी येथील कोविड सेंटर मध्ये जागा उपलब्ध असल्याने ४०० ऐवजी ५०० खांटांची व्यवस्था करणेकामी सुचना देणेत आलेल्या आहेत. तसा तपासणी अहवाल भोसरी रुग्णालयाकडुन प्राप्त झालेला आहे. त्या प्रमाणे मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस यांना दि.०३.०२.२०२१ ते ०२.०५.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असुन त्याकामी येणा-या र.रु.३,७८,२५,०००/- (अक्षरी र.रू.तीन कोटी अठ्याहत्तर लाख पंचवीस हजार फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१९७ विषय क्रमांक – ४७

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्य.सा.भां., वैद्यकिय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३६२/२०२१, दि.०१/०४/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) यास अधिन राहून कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी Antigen Test kits खरेदी करणेकामी प्रसिध्द केलेल्या ई-निविदेच्या अनुषंगाने M/s.Sudarshan Pharma Industries Ltd., Mumbai यांनी Immunoquick Covid-19 Rapid Antigen Test Kit ४,००० किटस् १,००,००० टेस्ट (25 Test per Kit) Rate per Test Rs.48/- अधिक GST प्रमाणे प्रति टेस्ट या दराने खरेदी करण्यास व निविदा र.रु.७९,००,०००/- पेक्षा ३९.२४% कमी दराने येणा-या र.रु.४८,००,०००/- (अक्षरी र.रू.अठ्ठेचाळीस लाख फक्त) अधिक GST चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१९८ विषय क्रमांक – ४८

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१७/कावि/८१०/२०२१, दि.०६/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारत सरकार तसेच राज्य शासनाने ''कोरोना'' विषाणूचा Covid-19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ लागू करुन राष्ट्रीय आपत्ती घोषित करुन ''कोरोना'' विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेकरिता युध्दपातळीवर कामकाज करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रसार मोठया प्रमाणात वाढत आहे. त्याप्रमाणे रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढत आहे. महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेले व करार पध्दतीने नियुक्त केलेले वैद्यकीय अधिकारी हे कोरोना बाधित झालेल्या रुग्णांचे रुग्णसेवेकरिता पुरेशा प्रमाणात नसलेने डॉ.डी.वाय.पाटील मेडीकल कॉलेज येथे MBBS झालेलेIntern विद्यार्थी यांचीं क्षेत्रीय कार्यालयातील वॉर रुमचे कामकाजाकरिता व Contact **Tracing** करीता वैद्यकिय विभागाकडील आदेश क्र. वैद्य/१७/कावि/७७८/२०२१ दिनांक ०४/०४/२०२१ या आदेशान्वये खालीलप्रमाणे नावासमोर नमूद केलेल्या क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी यांचे नियंत्रणाखाली कामकाज करणेकरीता नेमणूक करणेत आलेली आहे.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे/ प्रशिक्षणार्थी डॉक्टरांचेनाव | क्षेत्रीय कार्यालय व क्षेत्रिय अधिका-यांचे नाव |
|---|---|---|
| १ | डॉ. बनकर जान्हवी जयसिंग | पिंपरी चिंचवड महानगरपालिका, वॉर रूम |
| २ | डॉ. निनाद रनानवरे | |
| ३ | डॉ. सांची कपुर | |
| ४ | डॉ. सौम्या अरुण वर्मा | |
| ५ | डॉ. राधिका कपूर | |
| ६ | डॉ. खूशबू कूंडू | |
| ७ | डॉ. काव्या त्रिपाठी | |
| ८ | डॉ. श्रध्दा गुंबर | |
| ९ | डॉ. श्रेयस सिंग | |
| १० | डॉ. भाव्या तलवार | |
| ११ | डॉ. उदय सिंग बेरी | |
| १२ | डॉ. रिधिमा बेहल | |
| १३ | डॉ. ईशा नितीन केडीया | |
| १४ | डॉ. रागामाई मरामराजु | |
| १५ | डॉ. तान्या श्रीवास्तव | |
| १६ | डॉ. तेजस्वि शितोळे | |
| १७ | डॉ. जतिन अगरवाल | अ क्षेत्रीय, भेळ चौक निगडी श्रीम.सुचिता पानसरे, 9028887631 |
| १८ | डॉ. पूर्वा कविश्वर | |
| १९ | डॉ. अमित चौधरी | ब क्षेत्रीय, चिंचवड श्रीम.सोनम देशमुख 8999525377 |
| २० | डॉ. पलक मारफातिया | |
| २१ | डॉ. पलक अहुजा | क क्षेत्रीय, नेहरुनगर श्री.अवधुत तावडे 9765871546 |
| २२ | डॉ. जेनिशा पहुजा | |
| २३ | डॉ. रजत राणा | ड क्षेत्रीय, रहाटणी श्रीम.सुषमा कोल्हे (शिंदे) 9130555892 |
| २४ | डॉ. प्रतीक धनकर | |

| | | |
|---|---|---|
| २५ | डॉ. सक्शम गुलाटी | इ क्षेत्रीय कार्यालय, पांजरपोळ<br>श्री.राजेश आगळे 7722060910 |
| २६ | डॉ. शशांक तिवारी | |
| २८ | डॉ. निलाशीश दत्ता | |

| | | |
|---|---|---|
| २९ | डॉ. अर्थ निश्चल | ग क्षेत्रीय, थेरगांव गावठाण<br>श्री.श्रीनिवास दांगट 9822012687 |
| ३० | डॉ. सुमित मिश्रा | |
| ३१ | डॉ. रिबेरो लारा मारीया | ह क्षेत्रीय, कासारवाडी आय.टी.आय इमारत<br>श्री.अभिजीत हराळे 8805441650 |
| ३२ | डॉ. ईशा संदिप शहा | |

वैद्यकिय मुख्य कार्यालयाकडील आदेश क्र.वैद्य/१७/कावि/७७८/२०२१ दि.०४/०४/२०२१ मध्ये नमूद विद्यार्थी/प्रशिक्षणार्थी डॉक्टर यांनी त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी यांचे नियंत्रणाखाली कोरोना बाधित झालेल्या रुग्णाचे संपर्कातील नागरिकांचे **Contact Tracing** करावे व केलेल्या कामाचा अहवाल डॉ. क्रिस्टोफर झेविअर, समन्वय अधिकारी यांचेकडे सादर करावा. तसेच क्षेत्रिय कार्यालयात कामकाज करणारे प्रशिक्षित डॉक्टर यांचे हजेरीप्रमाणे वेतन संबंधित क्षेत्रिय कार्यालयामार्फत अदा करणेची कार्यवाही करणेत यावी. वॉररुम मधील विद्यार्थी/ प्रशिक्षणार्थी डॉक्टर यांनी डॉ. क्रिस्टोफर झेविअर, समन्वय अधिकारी यांचे नियंत्रणाखाली कामकाज करणेस व वॉररुम मधील कामकाज करणारे प्रशिक्षित डॉक्टर यांचे हजेरीप्रमाणे वेतन वैद्यकिय मुख्य कार्यालयामार्फत अदा करणेची कार्यवाही करणेत यावी. उपरोक्त आदेशान्वये नेमणूक केलेल्या विद्यार्थी यांनी अप्रामाणिकतायुक्त गैरवर्तनाचे कृत्य केलेस त्यांचेवर आपत्ती व्यवस्थापन नियम २००५ मधील विहीत तरतूदींच्या अनुषंगाने शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांनी आपले स्तरावर सदरच्या विद्यार्थ्यांची हजेरी प्रमाणे मानधन अदा करणेची कार्यवाही करणेत यावी. तरी हजर दिवसाप्रमाणे र.रु.३००/- मानधन अदा करणेकामी व येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९१९९ विषय क्रमांक – ४९
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.निता पाडाळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१५/कावि/२६०/२०२१, दि.०५/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विविध दवाखाना/ रुग्णालयात विविध अभिनामाची पदे एकत्रित मानधनावर ०६ महिने कालावधीसाठी भरणेकामी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ७८२२ दि. १६/१२/२०२० अन्वये मान्यता दिलेली असलेने जाहिरात क्र. ५८१ दि. ०७/१२/२०२० वर्तमान पत्रात व मनपा संकेत स्थळावर प्रसिद्ध करुन उमेदवारांच्या घेणेत आलेल्या लेखी परीक्षेमधील गुणानुक्रमानुसार आदेश क्रमांक - वैद्य/१७/कावि/९८/२०२१, दि. २७/०१/२०२१ तदनंतर विविध आदेश निर्गत करणेत आलेले असुन सदर निर्गत आदेशानुसार ४० वैदयकीय अधिकारी पदापैकी सद्यस्थितीत ३३ वैदयकीय अधिकारी विविध रुग्णालय / दवाखान्यात कार्यरत आहेत. तदनंतर कोविड १९ चे रुग्णांची पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात मोठ्या प्रमाणावर वाढ होत असलेने रुग्णालय / दवाखान्यातील कामकाजासाठी आवश्यक असणारी विविध अभिनामाची पदे एकत्रित मानधनावर

पुर्णता तात्पुरत्या स्वरुपात भरणेकामी मा.स्थायी समिती सभा यांनी ठराव क्र. ८७४७, दि. २६/०२/२०२१ नुसार मान्यता दिलेले व कोविड १९ चे आजाराने बाधीत रुग्णांची संख्या वाढलेने सन २०२० – २१मध्ये कोविड १९ चे कालावधीत मानधनावर काम केलेल्या कर्मचा-यांपैकी विविध आदेशा नुसार आजपर्यंत एकुण १४० वैदयकीय अधिकारी नियुक्ती कामी आदेश निर्गत करणेत आलेले आहेत. त्यापैकी आजअखेर ७२ वैदयकीय अधिकारी रुजु झालेले आहेत. मा.स्थायी समिती सभा यांचेकडील ठराव क्रमांक ९०५१ दि २४/०३/२०२१ अन्वये भविष्यात कोवीड १९ चा प्रादुर्भाव वाढुन रुग्णांच्या संखेत वाढ होवु शकते हि बाब विचारात घेता आणखी वाढीव पदांची आवश्यकता भासल्यास वाढीव पदे भरणेस तसेच त्यांना द्यावयाचे मानधनाचे अदायगी करिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड १९ विषाणुमुळे बाधीत रुग्णांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे कोविड १९ चे लसीकरण , कॉन्ट्रक्ट ट्रेसिंग , स्वॅब टेस्टिंग , रॅपीड अॅन्टीजेन / आरटी पीसीआर टेस्टिंग ,नव्याने सुरु होणारे कोविड केअर सेंटर मधील कामकाज, गृह विलगीकरण कक्षातील (Home Isolation) रुग्णांची माहीती घेणे तसेच वॉररुममधील कामकाज तसेच कोविड १९ अनुषंगाने सर्व झोननिहाय कामकाज करणेकामी वाढीव वैदयकिय अधिकारी या संवर्गातील उमेदवारांची अत्यंत तातडीने आवश्यकता आहे.वैदयकिय विभागामार्फत जाहिरात क्रमांक ५८१ दिनांक ०७/१२/२०२० अन्वये तसेच कोवीड १९ चे आपत्कालीन परिस्थीतीत काम केलेल्या ५२९ विविध संवर्गातील पदावरील कर्मचा-यापैकी निर्गत केलेल्या आदेशातील अनेक वैदयकिय अधिकारी अद्यापपर्यंत रुजु झालेले नाहीत. त्यामुळे सदयस्थितीत वाढीव वैदयकिय अधिकारी या संवर्गातील पदावर काम करणा-या कर्मचा-यांची तातडीने आवश्यकता आहे. वैदयकिय विभागासाठी वाढीव मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकामी कामाची तातडीने व निकड विचारात घेता सद्यस्थितीत परीक्षा घेणे , जाहिरात प्रसिद्ध करुन अर्ज मागविणे तसेच नियुक्तीसाठी अपेक्षित असलेल्या उमेदवांराची महापालिकेत गर्दी करणे योग्य होणार नाही. तसेच वैदयकिय अधिकारी पदावर काम करणारे उमेदवार वारंवार वैदयकिय विभागात नियुक्तीकामी येत असतात त्यांचेमधुन पात्र उमेदवारांची walk in interview द्वारे निवड केल्यास तातडीने वैदयकिय अधिकारी उपलब्ध होणे अपेक्षित आहे. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोवीड १९ विषाणुमुळे बाधीत रुग्णांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे कोविड १९ चे लसीकरण , कॉन्ट्रक्ट ट्रेसिंग , स्वॅब टेस्टिंग , रॅपीड अॅन्टीजेन / आरटी पीसीआर टेस्टिंग ,नव्याने सुरु होणारे कोवीड केअर सेंटर मधील कामकाज , गृह विलगीकरण कक्षातील (Home Isolation) रुग्णांची माहीती घेणे तसेच वॉररुममधील कामकाज तसेच कोविड १९ अनुषंगाने सर्व झोननिहाय कामकाज करणेकामी वाढीव वैदयकिय अधिकारी या संवर्गातील उमेदवारांची अत्यंत तातडीने आवश्यकता असलेने जाहिरात प्रसिद्ध करणेस, जाहिरातीनुसार उपलब्ध होणा-या वैदयकिय अधिकारी पदावरील उमेदवारांची Walk in interview द्वारे निवड करणेस, निवड झालेल्या उमेदवारांना जाहिरातीमध्ये नमुद केलेनुसार मानधन अदा करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२०० विषय क्रमांक – ५०

दिनांक – १५/०४/२०२१

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३२ मधील एम.एस.काटे चौका लगत नाला बंदिस्त करणे या कामाच्या जागेत बदल करणेचे असून सदर कामास दि.१४/०२/२०२० रोजी कामाचा आदेश देणेत आला आहे. सद्यस्थितीत काम चालू आहे. सदर कामा अंतर्गत नवि सांगवी येथील एम.एस.काटे चौका लगतचा नाला बंदिस्त करणेचे काम पुर्ण झाले आहे सदर निविदा रकमेतील अंदाजे र.रू.४९,५०,०००/-(अक्षरी र.रू.एकोण पन्नास लाख पन्नास हजार फक्त) रक्कम शिल्लक आहे. उर्वरीत शिल्लक रकमेतून मा.नगरसदस्य यांच्या मागणी नुसार प्रभाग क्र.३२ सांगवी मधील विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे करणेकामी तसेच सदरील प्रभाग क्र.३२ मधील एम.एस.काटे चौका लगत नाला बंदिस्त करणे या कामाच्या उर्वरीत शिल्लक रकमेतून सांगवी येथील विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे करणेसाठी कामाचे स्थळ बदलास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२०१ विषय क्रमांक – ५१

दिनांक – १५/०४/२०२१

सुचक – मा.राजू बनसोडे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.राजू बनसोडे, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

दापोडी गावाची झपाट्याने वाढती लोकसंख्या पहाता त्या ठिकाणी अद्ययावत स्वरूपाच्या व सर्व सुविधा उपलब्ध असलेल्या दवाखान्यांची अत्यंत गरज आहे. सध्याची लोकसंख्या पहाता दापोडी गावातील सरकारी दवाखान्यात साथीच्या आजारासोबत प्रसूती व इतर आजारांवर उपचार घेणा-या रूग्णांची संख्या जास्त आहे. तसेच खाजगी रूग्णालयात गोर गरीब नागरिकांना तातडीची सेवा गोरगरिब जनतेला न परवडणारी असून महानगरपालिकेच्या रूग्णालयात जागा अपुरी पडत असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो त्याची दखल घेत दापोडी येथील अनु.क्र.३/२९ स.नं.८५ अ या ठिकाणी प्रसुती गृह व अत्यावश्यक सोयीसह दवाखान्यांची आवश्यकता आहे. त्यासाठी २० गुंठे जागा आपक्षित आहे. त्याठिकाणी प्रशस्त रूग्णालय बांधण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२०२ विषय क्रमांक – ५२

दिनांक – १५/०४/२०२१

सुचक – मा.राजू बनसोडे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.राजू बनसोडे, मा. मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३० दापोडी येथे वाढती लोकसंख्या पहाता दापोडी स्मशान भूमित विद्युत दाहिनीची अत्यंत आवश्यकता असून त्याठिकाणी नव्याने विद्युत दाहिनी सुरू करण्यास मान्यता

देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२०३ विषय क्रमांक – ५३

दिनांक – १५/०४/२०२१

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.सुलक्षणा धर

संदर्भ – मा.शत्रुघ्न काटे, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महात्मा ज्योतीबा फुले व भारत रत्न डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचा प्रचार व प्रसार उपक्रमा अंतर्गत प्रबोधन पर्वाचे आयोजन दि.११/४/२०२१ ते १४/०४/२०२१ पर्यंत असे एकूण ४ दिवस करणेत येणार आहे. या प्रबोधन पर्वा अंतर्गत विविध सामाजिक व समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. सदर प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यास तसेच याकामी थेट पध्दतीने येणा-या र.रू.७५,००,०००/- (अक्षरी र.रू.पंच्याहत्तर लाख फक्त) किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे)**
सभापती**,** स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/७५९/२०२१
दिनांक - १६/०४/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

(क्र.स्था/नि/फ-मुख्य/३१३/२०२१ दि.२४/०३/२०२१ विषय क्र.३१ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य फ मुख्यालय
क्र.स्था/नि/फ-मुख्य/३१३/२०२१
दि.२४/०३/२०२१

प्रपत्र अ ( १ ते २ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा मान्यतेची खालील त्यावरील व कर प्रचलित करा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | १ |
| १ | मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन | ३४/०१/२०२०-२०२१ | प्रभाग क्र १३ मध्ये रस्त्यावर थर्मोप्लास्ट पेंटने रोड मार्कींग करणे नामफलक बसविणे बेंचेस बसविणे व एफ आर पी वाचनालय पुरविणे | ०५/०२/२०२१ | स्था/नि/फ-मुख्य/३०१/२०२१ | ०५/०२/२०२१ | ७,४९,२६५ | ७,३९,८६५ | ७०७ | ९,४०० | ३७.३६ | %कमी | ४ |
| २ | मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन | ३४/१९/२०२०-२०२१ | प्रभाग क्र ११ मध्ये बोर्ड बेंचेस बसविणे व थर्मोप्लास्टीक पेंटने पट्टे मारणे व इतर अनुषंगीक कामे करणे | ०५/०२/२०२१ | स्था/नि/फ-मुख्य/३००/२०२१ | १६/०३/२०२१ | १४,९९,९४२ | १४,९०,५४२ | ७०७ | ९,४०० | ३७.२६ | %कमी | ९ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

(क्र.जनि/२/कावि/४३९/२०२१ दि.२६/०३/२०२१ विषय क्र.३२ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ जलनि:सारण मुख्यालय
क्र.जनि/२/कावि/४३९/२०२१
दि.२६/०३/२०२१

प्रपत्र अ ( १ ते १ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा ख मान्यतेची खालील |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | | ९ | १० | ११ | १२ | | १३ |
| १ | मे.एच.एम.कन्स्ट्रक्शन | ६/२८/२०२०-२१ | प्रभाग क्र.१३ निगडी, यमुनानगर व परिसरातील चेंबर्स व ड्रेनेज लाईनची आवश्यकतेनुसार देखभाल दुरुस्ती करणे. | १०-०२-२०२१ | जनि/२/कावि /२३५/२०२१ | १५-०२-२०२१ | २२३५११० | २२२०३७० | १४७४० | ० | २७.७२ | % कमी | १६२० |
| एकुण र.रु. | | | | | | | २२३५११० | २२२०३७० | १४७४० | ० | | | १६२०२ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

(क्र.विमुका/०४/कावि/४५२/२०२१ दि.२६/०३/२०२१ विषय क्र.३३ चे लगत)

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी१८**
**विद्युत विभाग**
**प्रपत्र - अ**
**पत्र क्र. विमुका/04/कावि/ 452/2021 दि. 26 /03/2021 चे लगत**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा नोटीस क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाच्या आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. इलेक्ट्रो मेकॅनिक्स | 20-04/2019-2020 | फ' क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र 11 कृष्णानगरमधील उद्यानामध्ये आवश्यकतेनुसार नवीन पंप बसविणे व अनुषांगिक कामे करणे (सन-२०१९-२०) | 18-03-20 | विमुका/4/कावि/74/2021 | 14-01-21 | 1071288 | 21.75 | कमी% + G.S.T. | 838283 |
| 2 | मे. इलेक्ट्रो मेकॅनिक्स | 20-05/2019-2020 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. 13 मधील उद्यानामध्ये आवश्यकतेनुसार नवीन पंप बसविणे व अनुषंगिक कामे करणे | 18-03-20 | विमुका/4/कावि/76/2021 | 14-01-21 | 1071152 | 19.75 | कमी% + G.S.T. | 859599 |
| | | | | | | | 2142440 | | | |

(संजय खाबडे)
सह शहर अभियंता (वि/यां)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

(क्र.फक्षेका/नि-४/कावि/२०४/२०२१ दि.२४/०३/२०२१ विषय क्र.३४ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी -44

(विषयपत्र क्र.फक्षेका/नि-4/कावि/ 204 /2021 दि. 24/03/2021 लगत) प्रपत्र " अ "

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा दिनांक | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | निविदा स्विकृत दर | निविदा खर्चाची रक्कम (निविदा दरानुसार रक्कम + त्यावरील प्रचलित दराने वस्तु व सेवा कर अदा करावा) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कमल इलेक्ट्रीक एंटरप्रायजेस | 3/1/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र १२ मधील दिवाबत्ती व्यवस्थेच्या फिडर पिलर ची दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे. | 1/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/200/2021 | 22/03/2021 | 892445 | 19.00 %कमी | 722880 |
| 2 | कमल इलेक्ट्रीक एंटरप्रायजेस | 3/3/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र १ मधील स्ट्रिट लाईट पोल वरील खराब नादुरूस्त जक्शंन बॉक्स बदलणे. | 1/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/199/2021 | 22/03/2021 | 889300 | 23.00 %कमी | 684761 |
| 3 | पार्वती इलेक्ट्रीक एंटरप्रायजेस | 3/6/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग १ मधील दिवाबत्ती व्यवस्थे मधील खांबाची व फिडर पिलरची रंगरंगोटी (पेटींग) करणे. | 1/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/201/2021 | 22/03/2021 | 667561 | 17.00 %कमी | 554076 |
| 4 | जे पी ट्राफीक अँटोमेशन प्रा. लि. | 3/15/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र १२ मधील सिग्नलची देखभाल दुरुस्ती करणे. | 1/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/202/2021 | 22/03/2021 | 891424 | 19.50 %कमी | 717596 |
| 5 | जे पी ट्राफीक अँटोमेशन प्रा. लि. | 3/16/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र १३ मधील सिग्नलची देखभाल दुरुस्ती करणे. | 1/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/203/2021 | 22/03/2021 | 892577 | 19.50 %कमी | 718524 |
| 6 | कमल इलेक्ट्रीक एंटरप्रायजेस | 3/17/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र १ मधील उद्यानातील विद्युतविषयक देखभाल दुरुस्ती करणे. | 1/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/197/2021 | 22/03/2021 | 892837 | 23.00 %कमी | 687484 |
| 7 | प्रविण इलेक्ट्रीकल सर्व्हीसेस | 3/19/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र १२ मध्ये दिवाबत्ती व्यवस्थेतील खांबाना व फिडर पिलरला अर्थिंग करणे व सुरक्षितेच्यादृष्टीने विद्युत विषयक कामे करणे. | 3/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/193/2021 | 22/03/2021 | 892054 | 30.12 %कमी | 623367 |
| 8 | सनशाईन इलेक्ट्रीकल्स | 3/20/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र १३ मध्ये दिवाबत्ती व्यवस्थेतील खांबाना व फिडर पिलरला अर्थिंग करणे व सुरक्षितेच्यादृष्टीने विद्युत विषयक कामे करणे. | 25/02/2021 | फक्षेका/नि-4/कावि/191/2021 | 22/03/2021 | 892410 | 32.85 %कमी | 599253 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | सनशाईन इलेक्ट्रीकल्स | 3/22/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र १३ मधील हमी कालावधी संपलेल्या LED फिटिंग ची दुरुस्ती करणे व इतर आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. | 25/02/2021 | फक्षेका/नि-4/कावि/192/2021 | 22/03/2021 | 892478 | 30.16 %कमी | 623307 |
| 10 | पार्वती इलेक्ट्रीक एंटरप्रायजेस | 3/28/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र १२ मधील दिवाबत्ती व्यवस्थे करीताच्या खराब भुमीगत केबल बदलणे व केबलची देखभाल दुरूस्ती व इतर आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. | 1/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/198/2021 | 22/03/2021 | 892854 | 23.00 %कमी | 687498 |
| 11 | सनशाईन इलेक्ट्रीकल्स | 3/30/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १ मधील आवश्यक ठिकाणच्या दिवाबत्ती व्यवस्थे मधील नादुरुस्त खिळन्या दुरुस्त करणे , आवश्यक देखभाल दुरूस्ती व इतर आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. | 3/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/194/2021 | 22/03/2021 | 892755 | 27.85 %कमी | 644123 |
| 12 | प्रविण इलेक्ट्रीकल सर्व्हीसेस | 3/31/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र १ मधील हमी कालावधी संपलेल्या LED फिटिंग ची दुरुस्ती करणे व इतर आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. | 3/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/195/2021 | 22/03/2021 | 892588 | 27.23 %कमी | 649536 |
| 13 | सनशाईन इलेक्ट्रीकल्स | 3/32/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र १२ मधील हमी कालावधी संपलेल्या LED फिटिंग ची दुरुस्ती करणे व इतर आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. | 3/03/2021 | फक्षेका/नि-4/कावि/196/2021 | 22/03/2021 | 892827 | 27.25 %कमी | 649532 |
| | | | | | | **एकुण** | | | **8561937** |

**क्षेत्रिय अधिकारी**
फ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका